# उल्हासनगर महानगरपालिका उल्हासनगर

## सार्वजनिक बांधकाम विभाग

दिनांक : 26 ऑक्टोबर,२०२१.

**विषय :-** **उल्हासनगर-२ प्रभाग क्र. ७ मधील संत ज्ञानेश्वर नगर गेट ते जगु चहावाला पर्यंत पेव्हमेंट रोड व नाली बनविणे. या कामाच्या निविदा प्रक्रियेत पात्र/अपात्र निविदाकारांची माहिती संकेतस्थळावर प्रसिध्द करणेबाबत...**

**संदर्भ :-** **१) ई निविदा क्र. 2021_UMC_696912_1**

उक्त तक्त्यात नमुद केलेल्या माहितीनुसार निविदाकांराच्या कागदपत्रांची छाननी पुर्ण करण्यात आली. सदर छाननीत **१)मे.जय हिंद बिल्डर्स २) झा.पी.ॲन्ड कंपनी ३) मे.साई सिध्दनाथ कंस्ट्रक्शन** यांनी निविदा सादर केल्या आहेत. सदर निविदाकारांपैकी **मे. साई सिध्दनाथ कंस्ट्रक्शन** यांनी रु. ५०० च्या स्टॅंप पेपरवर प्रतिज्ञापत्र सादर केलेले नाही परंतू दुसरा लिफाफा सादर करणेपूर्वी सादर करणे आवश्यक असल्याच्या अटीवर कागदपत्रांच्या छाननी मध्ये वरील तीनही निविदाकार पात्र ठरले होते. परंतू मे.झा.पी.ॲण्ड कंपनी यांनी अशी तक्रार केली आहे की, मे.साई सिध्दनाथ यांनी निविदेकरीता अपलोड केलेले कागदपत्र स्पष्ट नसून अस्पष्ट आहेत. सदर तक्रार प्राप्त झाल्यानंतर वरील तीनही निविदाकारांना त्यांचे मुळ कागदपत्र तपासणी साठी कार्यालयात सादर करणेबाबत पत्र दिले. पत्रात असे स्पष्ट नमुद केले आहे की, जे कंत्राटदार मुळ कागदपत्र सादर करणार नाहीत, त्यांची निविदा अपात्र ठरविण्यात येईल. दिनांक १४/०७/२०२१ रोजी पत्र दिल्यानंतर कोणीही कागदपत्र सादर केले नसल्याने पुनश्च दिनांक ३० जुलै,२०२१ रोजी वरील तीनही कंत्राटदार यांना मुळ कागदपत्र सादर करणेसंदर्भात स्मरणपत्र देण्यात आले.

दिनांक ०२/०८/२०२१ रोजी १) मे.झा.पी.ॲण्ड कंपनी २) मे.एम.सी.चंदनानी कंन्स्ट्रक्शन ३) मे.जय भारत कंन्स्ट्रक्शन हे कंत्राटदार मुळ कागदपत्रांसह कार्यालयात आले असता, संबंधित उप-अभियंता यांनी मुळ कागदपत्रांची तपासणी केली आहे. तसा अहवाल उप-अभियंता यांनी सादर केला आहे. तथापी, यामध्ये मे.साई सिध्दनाथ कंन्स्ट्रक्शन यांनी विहित मुदतीत मुळ कागदपत्र तपासणीकरीता सादर केलेले नाही. त्यामुळे मे. साई सिध्दनाथ यांना अपात्र ठरविण्यात येत आहे.

**पात्र निविदाकार**

१) मे. झा.पी. ॲन्ड कं.

२) मे.जय हिंद बिल्डर्स

**अपात्र निविदाकार**

१) मे. साई सिध्दनाथ कंस्ट्रक्शन

वरीलप्रमाणे पात्र /अपात्र निविदाकारांची माहिती दिनांक २८/१०/२०२१ रोजी सायं.४.०० वाजेपासून ते ०१/११/२०२१ सायं ४.०० वाजेपर्यंत या कालावधीकरीता प्रसिध्द करण्यात येत आहे. याबाबत हरकती / सुचना असल्यास सार्वजनिक बांधकाम विभागाचे Ulhasnagar.pwd@gmail.com या मेलवर अथवा शहर अभियंता यांचे कार्यालयात लेखी स्वरुपात सादर कराव्यात.

शहर अभियंता
उल्हासनगर महानगरपालिका